**आर बी आय / २००४-०५/ ४७९**
**संदर्भ क्र. सीओ. डीटी. १५.०२.००१/एच-९८४४-९८६६/२००४-०५**

मे २५, २००५
ज्येष्ठ ४, १९२७ (२८)

महाव्यवस्थापक
शासकीय लेखा विभाग
स्टेट बँक ऑफ इंडिया व संलग्न बँका /अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक /इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया.

प्रिय महोदय,

**सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८- स्पष्टीकरण**

कृपया आमचे परिपत्रक क्र. सीओ. डीटी. १५.०२.००१/ एच- ९६१५/ २००४-०५ दिनांक मे १४, २००५ चा व त्यासोबत पाठविलेल्या, अर्थ मंत्रालय, भारत सरकारचे परिपत्रक दिनांक मे १३, २००५ सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८मधील सुधारणा, दिनांक १३ मे २००५ पासून सुधारित करण्यात आल्याचे कळविले होते.

२. या संदर्भात, इतर बाबींबरोबर, अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांनी, त्यांचे पत्र एफ २/८/२००५ एन एस - II दिनांक मे २०, २००५ द्वारा पुढील स्पष्टीकरणे दिली आहेत :-

i) अल्प बचत योजनांची व्याप्ति **केवळ व्यक्तींसाठीच** सीमित करण्यासाठी केलेल्या सुधारणांचा पुढील भाग म्हणून, कायदेशीर व्यक्तींना (एच यु एफ, विश्वस्त मंडळे, भविष्यनिधी इत्यादि) म्हणजे व्यक्ती नसलेल्या व्यक्तिगत संस्थानी (एकेरी, किंवा संयुक्त खात्याद्वारे किंवा अज्ञान बालकांच्या आणि नियमाप्रमाणे दुर्बल मनाच्या व्यक्तींच्या पालकांद्वारे ) दिनांक १३मे. २००५ किंवा नंतर, व सार्वजनिक भविष्यनिधी योजना, १९६८ सह इतर कोणत्याही अल्प बचत योजनेमध्ये उघडलेली खाती (असल्यास), प्रारंभापासूनच निरर्थक समजली जातील आणि अशी खाती बंद करण्यासाठी व **या ठेवी खातेदारांना कोणतेही व्याज न देता** परत करण्यासाठी ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी.

ii)तथापि हे नमूद केले जावे की, दिनांक मे १३, २००५ च्या सुधारणांच्या आधी अस्तित्वात असलेल्या नियमांनुसार उघडल्या गेलेल्या अस्तित्वात असलेल्या / **सध्याच्या खात्यांना या सुधारणा लागू होणार नाहीत**, ही खाती त्यांच्या परिपक्वतेपर्यंत सुरु राहतील आणि या खात्यांमध्ये/ मधून

जमा/ निकासी करण्यास वरील नियमांनुसार परवानगी अवलंबून असेल.तथापि अशा खात्यांना पुढील वाढ मे १३, २००५ च्या सुधारणांनुसार असेल.

३. हे लक्षात घेऊन आपण पी पी एफ योजना, १९६८ कार्यान्वित करणाऱ्या आपल्या नियोजित शाखांना योग्य त्या सूचना द्याव्यात. व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत आहे इकडे लक्ष द्यावी.

४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू

(डी. राजगोपाल राव)
उप महाव्यवस्थापक